# मराठी साहित्य
## समाज आणि संस्कृती

प्रा. डॉ. विठ्ठल जम्बाले
डॉ. सर्जेराव रणखांब
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे



Scanned with CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स

# मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती

Marathi Sahitya : Samaja Aani Sanskruti

© प्राचार्य, देगलूर महाविद्यालय, देगलूर

ISBN : 978-93-95710-77-0

पुस्तक प्रकाशन क्र. ११०९

**प्रकाशक व मुद्रक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.

**संपर्क :** ९४०५२०६२३०

**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी, तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.

**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

**ई-मेल :** atharvapublications@gmail.com

**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २ मार्च २०२३

**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ६५०/-

---

**E-Book** ***available on***

**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

---

*या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या पुस्तकातील लेखातील अभ्यासकांनी मांडलेल्या मताशी प्रकाशक, मुद्रक, संपादक मंडळ, प्राचार्य सहमत असतीलच असे नाही.*



Scanned with CamScanner

# –: अनुक्रमणिका :–

१. मराठी समाज : साहित्य आणि संस्कृती विचार ........................ ९
– डॉ. विश्वनाथ शिंदे

२. विद्रोह : संत आणि दलित साहित्य ........................................ १७
– डॉ. संभाजी पाटील
– प्रा. बापूसाहेब जावळेकर

३. संतांचे शाश्वत शिक्षणशास्त्र आणि राष्ट्रीय शैक्षणिक ................ २६
धोरण २०२०
– डॉ. रवींद्र बेम्बरे

४. आदिवासी नाटक – आदिम वंचनेची व्यथा ................................ ३३
– डॉ. बालाजी पोतुलवार

५. मराठी साहित्य आणि समाज ................................................ ३७
– डॉ. विजय गणपतराव वारकड

६. संस्कृती : संकल्पना व स्वरूप ............................................... ४१
– डॉ. प्रशांत भंडे

७. शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा सौंदर्यविचार ...................................... ४५
– डॉ. राहुल हांडे

८. भटक्या–विमुक्तांचे साहित्य आणि वैचारिकता ........................ ५२
– डॉ. संजय बालाघाटे

९. भटक्या–विमुक्त जमातीची आत्मकथने ................................... ५६
– डॉ. एकनाथ वैजनाथ भिंगोले

१०. मुस्लीम मराठी कादंबरीतील हिन्दू–मुस्लीम समाजाच्या .............. ६२
सहजीवनाचे चित्रण
– डॉ. मुतवल्ली मैनोद्दीन

११. साहित्य : समाज आणि संस्कृती ............................................. ७०
– डॉ. गणेश लहाने

१२. साहित्य आणि संस्कृतीतील अनुबंध ........................................ ७७
– डॉ. रत्नाकर चंद्रकांत बेडगे

१३. मराठी ललितगद्यातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनदर्शन ....... ८३
– तनुजा उल्हास ढेरे



Scanned with CamScanner

# विद्रोह : संत आणि दलित साहित्य

– डॉ. संभाजी पाटील
– प्रा. बापूसाहेब जावळेकर
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**प्रस्तावना**

भारतीय समाजव्यवस्था मूलतः विषमतेवर आधारित किंवा उभारलेली आहे. विषमता हाच तिचा पाया आहे. ही विषमता अनेक प्रश्नांना जन्माला घालते. या विषमतेला आधार दिला तो हिंदू धर्मग्रंथ, श्रुती, स्मृती, शास्त्रे व पुराणे यांनी. हिंदू धर्म आणि चतुर्वर्ण्यव्यवस्थेतून जन्मास आलेली जातिव्यवस्था, अस्पृश्यता, अज्ञान, दारिद्र्य आणि लाचारी व त्यातून वाढीस लागलेली गुलामगिरीची प्रवृत्ती, स्वस्वार्थातून उदयास आलेली सामंतशाही, भांडवलशाही व देवधर्माचा हवाला देऊन माणसाने माणसांवरच अनन्वित अत्याचार केले. ते आजही सुरूच आहेत. फरक इतकाच की आज त्याचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे माणूस मानसिक व शारीरिकदृष्ट्या दास बनला. बौद्धिक व वैचारिक जागृतीशिवाय त्याची दास्यवृत्ती नष्ट होणार नाही हे ओळखून समानतेसाठी चार्वाक, बुद्ध ते महात्मा बसवण्णा यांच्यापासून सुरू झालेला संघर्ष, त्यासाठी उभा केलेला लढा महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधिक धारदार केलेला आहे. त्यांचा हा संघर्ष विद्रोहाचेच व्यापक रूप आहे. या महापुरुषांच्या विचारांना प्रमाण मानून निर्माण झालेल्या साहित्याचे स्वरूप हे विद्रोही आहे.

**विद्रोह व द्रोह यातील फरक**

विद्रोह म्हणजे समाजद्रोह नव्हे, तर वाईटास, अन्याय-अत्याचारास, शोषणास व छळास विरोध करणे होय. यातून मूल्यभाव व विद्रोह यांचा घनिष्ठ संबंध आहे हे स्पष्ट होते. विद्रोह म्हणजे केवळ विरोधासाठी विरोध, आक्रोश, वितंडवाद, अकांडतांडव, सातत्याने होत असलेला शिवराळ भाषेचा वापर, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड म्हणजे विद्रोह असा एक समज पसरला आहे. परंतु हा समज गैरसमज असून विद्रोह म्हणजे केवळ द्रोह नाही. विद्रोह हा सकारात्मक परिवर्तनासाठी, नवनिर्मितीसाठी, समाजाच्या पुनर्रचनेसाठी असतो. विद्रोहाला सीमा आहे. त्यात सूडाची भावना नाही. विद्रोह समाजाचा मित्र असतो. त्याचे स्वरूप आक्रमक असले तरी ते तात्कालिक असते. कधी कधी सुसंवादासाठी



Scanned with CamScanner

विद्रोहाची फार आवश्यकताही असते. अगदी याच्याविरुद्ध द्रोहाचा अर्थ आहे. द्रोह हा विध्वंसक असतो. त्याच्यात सूडाची भावना लपलेली असते. स्वस्वार्थातून द्रोहाचा जन्म होतो. द्रोहात विश्वासघात व विनाशकता भयानक असते. त्याला कसल्याही प्रकारची सीमा नसते व त्याला अंतही नाही. वरील विवेचनावरून विद्रोह आणि द्रोह यातील फरक समजण्यास मदत होते.

**विद्रोहाचे स्वरूप**

विद्रोह हा मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी असतो. मूल्यभावाशिवाय विद्रोहाला काहीही अर्थ नाही. समानतेसाठी विषमतेला नकार हे विद्रोहाचे मध्यवर्ती सूत्र आहे. विषमतेला, भेदभावाला, अन्याय व्यवस्थेला, दुराचाराला नकार देत सामाजिक समतेसाठी उभा केलेला शांततापूर्ण लढा म्हणजे एक प्रकारे विद्रोहच होय. मानवतेच्या आड येणाऱ्या जात, धर्म, वर्ण, संस्कृती, अनिष्ट परंपरा, ईश्वर, स्वर्ग–नरक, पुनर्जन्म यांना नाकारण्यातून एक प्रकारे विद्रोहच प्रकट होतो.

तथागत बुद्ध दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे, असे सांगतात. पण या देशातील माणसाचे दुःख जसे सामाजिक आहे तसेच ते आर्थिकही आहे. संपत्तीच्या मालकी हक्कातून, अस्पृश्यतेतून शोषणसत्तेचा आणि दुःखाचा उगम झाला. दुःखाला कारण आहे ती येथील 'जात'. या जातीनेच दुःख, दैन्य–दारिद्र्य, दास्य, अस्पृश्यता निर्माण केली. जातीला कारण ठरली ती वर्णव्यवस्था. या वर्णव्यवस्थेने धार्मिक विषमतेबरोबरच सामाजिक विषमतेला धर्मशास्त्रांचा मूलभूत आधार देण्याचा प्रयत्न केला. त्यातून ब्राह्मणशाही अधिक बळकट झाली. ते धर्माचे ठेकेदार बनले. जातीभेदाने मानवतेचा, त्याच्या बौद्धिक व आत्मिक शक्तीचा प्रचंड नाश केला. जातीभेदाने माणसाला मातीमोल करीत परस्परांत राग, द्वेष, चीड आणि तिरस्कार पेरला. त्यातून त्याविरुद्ध प्रक्षोभ निर्माण झाला. आणि त्या प्रक्षोभातून विद्रोह जन्मास आला. त्या विद्रोहाचे स्वरूप प्रातिनिधिक स्वरूपात साहित्याच्या माध्यमातून तपासावयाचे आहे.

**विद्रोह आणि साहित्य यांचा परस्परसंबंध**

साहित्य आणि समाज यांच्यातील असलेला अनोन्यसंबंध सर्वमान्य आहे. विद्रोह आणि साहित्य यांचा परस्पर संबंध दलित साहित्य प्रवाहाच्या संबंधाने तपासावयाचा आहे. साधारणतः कोणताही साहित्य प्रवाह हा कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र–आत्मचरित्र या प्रमुख प्रकारांनी समृद्ध होत गेलेला आहे.

विद्रोह आणि साहित्य या दोन्हीही संकल्पना परस्परावलंबी व परस्पर पूरक अशा आहेत. विद्रोह साहित्यनिर्मितीला आशयद्रव्य पुरवीत असते, तर साहित्याच्या माध्यमातून विद्रोहाचे स्वरूप आविष्कृत होत असते. साहित्याच्या विविध प्रकारांतून विद्रोहाची अनेकविध रूपे अनुभवास येतात.



Scanned with CamScanner

## संत साहित्यातील विद्रोहाचे स्वरूप

'भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें'[१] हा संकल्प घेऊन निघालेल्या ज्ञानेश्वरांनी मानवमात्राला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. 'भूत, मैत्र आणि जीव' हे शब्द खूप महत्त्वपूर्ण आहेत. प्रत्येक देहधारी हा भूत आहे, अशा देह धारण करणाऱ्या साऱ्यांच्या मनात परस्परांबद्दल सात्त्विक भाव, स्नेह आणि प्रेमभावना असावी. जात, धर्म, भाषा आणि प्रांत आदींवरून द्वेष, वैर किंवा असूया नसावी. संत नामदेव, तुकाराम आदी संतांनी आपल्या आध्यात्मिक कृतीने महाराष्ट्रात तेराव्या शतकात सांस्कृतिक चळवळीला आरंभ केला. ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य याबरोबरच जात, धर्म, वर्ण यातून फोफावलेली विषमता, त्यातून निर्माण झालेले कर्मकांड, त्यात रुतलेल्या मानवजातीला सावरण्यासाठी मानवतेची शिकवण देणे त्यांना आवश्यक वाटले होते. यातूनच 'हरि हरा भेद नाही, देव दगडात नाही, तो सज्जनात आहे'[२] अशी अध्यात्माची शिकवण पुढे आली. मनुष्यमात्रात 'मित्रभाव' नांदावा म्हणून समाजव्यवस्था आकाराला आली. मात्र येथील समाजव्यवस्था चातुर्वर्ण्य रचनेस प्रमाण मानून जातीव्यवस्थेवर उभी राहिलेली आहे. या समाजव्यवस्थेत एक जण 'माणूस' म्हणून प्रतिष्ठेचे जीवन जगतोय, तो सर्व प्रकारच्या सुखांचा उपभोग घेतोय, तर त्याच व्यवस्थेने दुसऱ्याला माणूस म्हणून जगणे अशक्य करून टाकले. त्यांना अस्पृश्य ठरवून बहिष्कृत केले. सामाजिक जीवनात असलेली जातीभेदाची तीव्रता आध्यात्मिक क्षेत्रात मात्र तितकीशी तीव्र दिसत नाही. देव फक्त भक्तिभावाचा भुकेला आहे. त्याला 'जाती कुळ वर्ण । हे अवघेचि गा अकारण'[३] आहे म्हणून समाजात नसले तरी जातीचे 'भेदाभेद भ्रम अमंगळ' चंद्रभागेच्या पाण्यात धुऊन काढण्याचा संतांनी प्रयत्न केला. त्यामुळे अठरापगड जातीतील संतांना आध्यात्मिक क्षेत्रात आपला नावलौकिक निर्माण करता आला. हे खरे असले तरी जातीयतेच्या चटक्यातून त्यांचीही सुटका झालेली नाही, हे पुढील अभंगातून प्रत्ययाला येते. 'हीन याति माझी देवा । कैसी घडो तुमची सेवा'[४] अशी आंतरिक वेदना व्यक्त करणारे संत चोखामेळा 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा'[५] असा परखड सवाल विचारून मनातील विद्रोहाला ते वाट मोकळी करून देतात. अन्यायाविरुद्ध हुंकार भरणारा पहिला विद्रोही कवी म्हणून संत चोखामेळा यांच्याकडे पाहता येते. तर आपल्या ठसठसत असणाऱ्या वेदनेला व्यक्त करण्यासाठी कर्ममेळा लिहितो, –

आमची केली हीन याती । तुझं का नकळे श्रीपती ।।
जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमचे चित्ता ।।
आमचे घरी भात दही । खावोनी कैसा म्हणसी नाही ।।
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । कासया जन्म दिला मला ।।[६]



Scanned with CamScanner

हा तिखट आणि परखड सवाल विचारणाऱ्या कर्ममेळ्याचा विद्रोही स्वर चोखामेळा यांच्यापेक्षा अधिक प्रखर झालेला अनुभवास येतो.

नामयाची जनी म्हणून धन्यता मानणारी संत जनाबाई 'राग येऊनी काय करिसी । तुझे बळ आम्हा पाशी' असे म्हणून विठ्ठलाला चिडविणारी जनाबाई- 'अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या'[७] असे म्हणत सर्वश्रेष्ठ ईश्वराला फटकारत आपल्या मनातील संताप व्यक्त करते. हे स्त्री विद्रोहाचे एक रूप होय. गणिकेच्या पोटी जन्मलेली कान्होपात्रा कोणाही पुरुषाला देह विकण्याऐवजी ती आपले तनमन विठ्ठल चरणी अर्पण करते. तरीही तिची एक स्त्री म्हणून होणारी अवहेलना थांबत नाही. तेव्हा ती सर्वसाक्षी ईश्वराला म्हणते,

'पतित पावन म्हणिसी आधी
तरी का उपाधी भक्ता मागे
तुझे म्हणविता दुजे अंगसंग
उणेपणा सांग कोणाकडे
सिंहाचे भातुके जांबुक पै नेता
थोराचिया माथा लाज वाटे
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे
करावा जतन ब्रीदासाठी'[८]

कान्होपात्रा या अभंगातून केवळ विठ्ठलास दूषणच देत नाही, तर ती त्याच्याविरुद्ध विद्रोह पुकारते आहे. थोडक्यात संत साहित्यातून व्यक्त झालेल्या विद्रोहाचे स्वरूप आध्यात्मिक क्षेत्रापुरतेच मर्यादित होते. त्यांचा विद्रोह व्यक्तिगत स्वरूपाचा होता. त्याला सामाजिक आयाम लाभले नाहीत. आध्यात्मिक क्षेत्रातील लोकशाहीला सामाजिक लोकशाहीत संतांना परिवर्तित करता आले नाही.

संत साहित्यातून व्यक्त झालेल्या विद्रोहापेक्षा आधुनिक काळातील कवितेतून व्यक्त झालेल्या विद्रोहाचे स्वरूप अधिक प्रखर असल्याचा प्रत्यय येतो.

**आधुनिक कालखंडातील साहित्य व त्यातील विद्रोहाचे स्वरूप**

हिंदू धर्म आणि चातुर्वर्ण व्यवस्थेतून जातीव्यवस्था उदयास आली. तिने जातीव्यवस्थेच्या चक्रव्यूहात अडकलेल्या समूहांच्या आत्मिक आणि नैसर्गिक शक्तीचा प्रचंड संहार केला. जातीभेदाने माणसाला मातीमोल केले. परस्परांत राग, चीड, द्वेष आणि तिरस्कार पेरला. हे जातीभेदाचे विष हिंदू समाजात खोलवर जाऊन भिनले आहे. दुःख, दैन्य-दारिद्र्य, यात शतकानुशतके पिचलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' मधून म्हणतात,

'विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।



Scanned with CamScanner

नीतीविना गती केली । गतीविना वित्त गेले ।
वित्तविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।[९]

हा प्रखर व प्रकाशमय विचार बुद्धांनंतर महात्मा फुले यांनी मांडून येथील सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध अन्याय, अज्ञान व निरक्षरतेविरुद्ध विद्रोह छेडला. ह्या विद्रोहाला अधिक तीव्र आणि धारदार करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बाबासाहेबांच्या कृतीविचाराने प्रेरित झालेला समाज आपल्या नैसर्गिक हक्कासाठी जागृत झाला. दबलेल्या, बहिष्कृत ठरवलेल्या समाजात आत्मभान आले. हरवलेला लढाऊपणा जागृत झाल्याने समाजमनात नवचैतन्य निर्माण झाले. त्यांच्या जीवनविषयक जाणिवा बदलल्या. हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या शोषणाच्या परंपरेला जागृत झालेला समाज आपल्या प्रत्यक्ष जगण्यातून व साहित्याच्या माध्यमातून चीड, संताप, नकार, वेदना आणि विद्रोहाच्या माध्यमातून छेद देऊन स्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्याय, बंधुता आणि मानवता या सर्वोच्च मानवी मूल्यांचा आग्रह धरू लागला. माणसातील माणूसपण नाकारणाऱ्या परंपरांना, विचारांना त्यांनी नकार दिला. या नकारामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक तत्त्वज्ञान आहे. माणसाला गुलाम करणाऱ्या अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेला व वर्गव्यवस्थेला मुळापासून उखडून टाकण्याचे सामर्थ्य बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानात आहे. या तत्त्वज्ञानावरच दलित साहित्याची उभारणी झाली. हे तत्त्वज्ञानच विद्रोही साहित्यनिर्मितीची मूळ प्रेरणा आहे. विद्रोह हा दलित साहित्याचा महत्त्वाचा विशेष होय. विद्रोही साहित्य परिवर्तनाचा आग्रही पुरस्कार करते. या विद्रोहाची विविध आणि अनंत रूपे दलित साहित्यातून प्रकट झालेली दिसून येतात. 'दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान' या ग्रंथात बाबूराव बागूल म्हणतात, 'ह्या जगात माणूस वर्णाने, वर्गाने, धर्माने, जातीने, जन्माने उच्चनीच म्हणून ओळखला जाणार नाही; जेथे सर्वांना समान संधी राहील असे जग आम्हाला हवे आहे.'[१०] असे म्हणून बागूल प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीवर आधारित नवसमाजनिर्मितीचे स्वप्न पाहतात. दलित साहित्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून विवेकी विचारांनी अविवेकाला, वर्चस्ववादाला नाकारत त्याविरुद्ध विद्रोह पुकारते आहे. हा विद्रोह अन्याय-अत्याचाराच्या प्रक्षोभातून जन्मास आला आहे. आपण माणूस आहोत आणि माणसाचे सारे हक्क आपल्याला मिळायला हवेत, या जाणिवेतून हा विद्रोह आला आहे. व्यक्ती विकासाला विरोध करणाऱ्या विचारधारेविरुद्ध हा विद्रोह आहे. जातीय भावनेविरुद्ध, दुष्ट प्रथांविरुद्ध, बालविवाह, केशवपन इत्यादी अनिष्ट प्रथांविरुद्ध केलेल्या सवर्ण समाजसुधारकांच्या विद्रोहापेक्षा दलित साहित्यातून व्यक्त झालेला विद्रोह निराळा आहे. या संदर्भात बाबूराव बागूल म्हणतात,



Scanned with CamScanner

केवळ समाज सुधारण्याने अस्पृश्यता जात नाही. अस्पृश्यता घालवायची असेल तर केवळ समाज बदलून जमणार नाही; तर राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. अशा सम्यक क्रांतीसाठी दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते.[११] माणसाच्या शत्रूशी, माणसाला कमी समजणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध हा विद्रोह आहे. हा विद्रोह व्यक्तिविकासाला विरोध करणाऱ्या विचारधारेविरुद्ध आहे. याचा प्रत्यय नामदेव ढसाळ यांच्या 'पाणी' या कवितेतून येतो. ते लिहितात,

'हे छळकऱ्यांनो,
पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलंच नसतं जगात
पाणीटंचाई आली तर तुम्ही शर्टासारखी शहरं बदलता
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणारांनी
काय बदलावं?'[१२]

तर 'कोंडवाडा'मध्ये दया पवार लिहितात,

'आज विषाद वाटतो, कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या
गाळात हत्ती कळप रुतावा तशा, ध्येय-आकांक्षा रुतलेल्या
शिळेखाली हात होता, तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्मांची कैद, कुणी निर्मिला हा कोंडवाडा?'[१३]

नामदेव ढसाळ यांच्या प्रखर विद्रोहापेक्षा दया पवारांच्या 'कोंडवाडा' मधील विद्रोहाचे स्वरूप संयत आहे. मात्र,

'साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुरानं घामेजलं हाडकं शरीर पुसशील काय?'

असा जहाल प्रश्न विचारणारे केशव मेश्राम 'उत्खनन' मधून नव्या विद्रोहाला जन्माला घालतात. तर यशवंत मनोहर आपल्या उत्थान गुंफा काव्यसंग्रहामधून,

'पाखंड्यांनो आता । नका मारू थापा ।
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या ।।'[१४]

असा इशारा देत आपला प्रखर विद्रोह व्यक्त करतात. हिरा बनसोडे ही कवयित्री आपल्या 'फिर्याद' या कवितेतून भारतीय प्राचीन संस्कृतीचा धिक्कार करताना म्हणते,

'या देशाच्या महान संस्कृती,
तुला कोपरापासून नमस्कार...!
जगातील अतिप्राचीन नि उच्च संस्कृती म्हणून
तुला अभिवादन करायला नाही विसरलो



Scanned with CamScanner

पण आज पाठ्यपुस्तकातल्या
खोट्या वर्णनांची चीड येते
नि तुला आई म्हणताना आम्हाला लाज वाटते.
तू आई असलीस तरी
आमच्याशी केलेस सावत्रपणाचे विषम राजकारण
हे संस्कृती, आमचं माणूसपण तू पिंजून पिंजून काढलेस,
ज्वालामुखीचा नांगर आमच्या घरादारावर फिरवलास
आम्ही राख राख झालो बेचिराख झालो.''[१५]

अशा अनेक कवितांमधून विद्रोहाची विविध रूपे अनुभवास येतात. थोडक्यात नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार, केशव मेश्राम, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, अरुण इंगळे, भीमसेन देठे, अरुण कांबळे, रविचंद्र हडसनकर, शरणकुमार लिंबाळे, अशा अनेक कवींनी आपापल्या कवितांमधून विद्रोहाची अनेक विविध रूपे चित्रित केलेली आहेत.

दलित आत्मकथने ही संख्येने आणि गुणवत्तेनेही नजरेत भरणारी आहेत. दया पवार–बलुतं, प्र. ई. सोनकांबळे– आठवणीचे पक्षी, माधव कोंडविलकर– मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, लक्ष्मण माने–उपरा, लक्ष्मण गायकवाड– उचल्या, मल्लिका अमर शेख– मला उद्ध्वस्त व्हायचंय, कुमुद पावडे– अंतःस्फोट, नामदेव व्हटकर– कथा माझ्या जन्माची, भीमराव गस्ती– बेरड, किशोर शांताबाई काळे–कोल्हाट्याचं पोर या व अशा अनेक आत्मकथनातून विद्रोहाची विविध रूपे अनुभवास येतात. स्त्री शूद्रातिशूद्रांना माणूस म्हणून जगण्याचे नैसर्गिक हक्क नाकारणारा, विशिष्ट वर्गावर जुलूम, अन्याय–अत्याचार करणारा हा विचार व त्याला आधार देणारे धर्मग्रंथ नाकारणे अगदी अपरिहार्य होते. त्या अपरिहार्यतेतून विद्रोही साहित्याचा जन्म झाला आहे.

कथेच्या संदर्भाने विचार करता दलित कथेचे शिल्पकार अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल, यासोबतच ना. रा. शेंडे, बंधुमाधव मोडक, अर्जुन डांगळे, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम, वामन होवाळ, ऊर्मिला पवार, धर्मराज निमसरकर अशा अनेक कथालेखकांनी दलित कथेचे दालन समृद्ध करण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कथांमधून विद्रोहाची विविध रूपे अनुभवास येतात.

दलित कादंबरीच्या क्षेत्रामध्येही शंकरराव खरात, बाबूराव बागूल, अण्णा भाऊ साठे, केशव मेश्राम, ही. गो. बनसोडे, हरिभाऊ पगारे, ज. वि. पवार, नामदेव ढसाळ, भि. शी. शिंदे, उत्तम बंडू तुपे, माधव कोंडविलकर, भीमसेन देठे,



Scanned with CamScanner

अशोक गजभिये, अशोक व्हटकर, यशवंत मनोहर, प्रज्ञावंत गौतम, उत्तम कांबळे, लक्ष्मण गायकवाड, प्रेमानंद गज्वी, शरणकुमार लिंबाळे अशा अनेक लेखकांनी कादंबरी हा प्रकार हाताळून आपल्या समाजव्यवस्थेत खदखदत असलेला अंतर्गत असंतोष विद्रोहाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकेतील निग्रोंनी जे जगले, भोगले ते निर्भयपणे कोणाचीही पर्वा न करता आपले दुःख रंगभूमीवर आणले आणि 'ब्लॅक थेटर' प्रतिष्ठित केले. काळ्या-गोऱ्यांचा संघर्ष हाच ब्लॅक नाटककाराचा प्रिय विषय होता. त्यांनी आपल्या रंगभूमीला जागृतीचे व्यासपीठ बनविले. तेच काम दलित रंगभूमीने केले आहे. दलित रंगभूमी किंवा नाटक हे मराठी नाटकाचा एक भाग असले तरी त्याचे स्वतंत्र अस्तित्व आहें. तमाशा, जलसा प्रहसन, दंढार हे सर्व नाट्यप्रकार प्रामुख्याने महार समाजातून उदयाला आले असून हे नाट्यप्रकार म्हणजे आजच्या दलित नाटकाचे पूर्वरूप होत. जलशामध्ये सत्यशोधकीय जलसा व आंबेडकरी जलसा असे दोन प्रकार असून महात्मा जोतिराव फुले यांचे विचार तळागाळातील माणसांपर्यंत पोहोचवण्याचे काम सत्यशोधकीय जलशांनी केले. 'सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा'च्या माध्यमातून किसन फागू बनसोडे यांनी महार आणि भट यांचा संवाद दिला आहे. तर प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी 'युगयात्रा'मधून संघर्ष करणारा, अन्यायविरुद्ध पेटून उठणारा, मूक समाजाला जागृत करणारा नायक उभा केला आहे. तर भि. शि. शिंदे, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, टेक्सास गायकवाड, प्रभाकर दुपारे, प्रकाश त्रिभुवन, रुस्तुम अचलखांब, अविनाश डोळस, मधुसूदन गायकवाड, संजय पवार यांची नावे दलित नाटककार म्हणून प्रामुख्याने पुढे येतात.

थोडक्यात दलित कविता, आत्मकथन, कथा, कादंबरी, आणि नाटक या सर्वांनी मिळून दलित साहित्याचा प्रवाह समृद्ध केला आहे. यालाच विद्रोही साहित्य असे म्हटले जाते. मुळात दलितांचा विद्रोह वेदनेतून जन्मला असून त्यांची वेदना सामाजिक अन्याय-अत्याचारातून उद्भवलेली आहे. मात्र या विद्रोही साहित्यावर उरबडवे, आक्रस्ताळे, तेच तेच सांगणारे साहित्य असे आक्षेप घेण्यात आले आहेत.

**निष्कर्ष**

१. विषमतेच्या प्रक्षोभातून विद्रोह जन्मास आला आहे.
२. साहित्य आणि विद्रोह हे परस्परावलंबी व परस्पर पूरक आहेत.
३. समानतेसाठी विषमतेला नकार हे विद्रोहाचे मध्यवर्ती सूत्र आहे.
४. मूल्यभावाशिवाय विद्रोहाला अर्थ नसतो. म्हणजेच मूल्यात्मकता हा विद्रोहाचा स्थायीभाव आहे.



Scanned with CamScanner

५. विद्रोह हा दलित साहित्याचा महत्त्वाचा विशेष होय.

६. विद्रोही साहित्य परिवर्तनाचा आग्रही पुरस्कार करते. या विद्रोहाची विविध आणि अनंत रूपे दलित साहित्यातून प्रकट झालेली दिसून येतात.

७. विद्रोह समाजाचा मित्र असतो. त्याचे स्वरूप आक्रमक असले तरी ते तात्कालिक असते.

**संदर्भ**


१. भालचंद्र फडके : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह : श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्र. आ. डिसेंबर १९७७, पृ.४४.

२. ल. रा. नासिराबादकर : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती१९८८, पृ. ७७.

३. तत्रैव : पृ. ८१.

४. तत्रैव : पृ. ८१.

५. तत्रैव : पृ. ८१.

६. डॉ. अविनाश सांगोलकर : दलित साहित्य उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ. ६ डिसेंबर २०१०, पृ.३४.

७. ल. रा. नासिराबादकर : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर तिसरी आवृत्ती१९८८, पृ. ८१.

८. तत्रैव : पृ. ८१.

९. म. जोतिराव फुले : शेतकऱ्याचा आसूड, समता प्रकाशन समता सैनिक दल, नागपूर, तृतीय आ. ६ डिसेंबर २०००, उपोदघात, पृ.८.

१०. बाबूराव बागूल : दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान, बुद्धिष्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर, प्र. आ. १५ ऑगस्ट १९८१, पृ.९.

११. भालचंद्र फडके : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह : श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्र. आ. डिसेंबर, १९७७ पृ. ६७.

१२. डॉ. अविनाश सांगोलकर : दलित साहित्य उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. ६ डिसेंबर २०१०, पृ. ३७.

१३. तत्रैव : पृ. ४०.

१४. तत्रैव : पृ. ४६.

१५. तत्रैव : पृ. ५५




Scanned with CamScanner